| MHLA160002122019 | **नियमित दिवाणी दावा क्र.४०/२०१९**<br>**संजीव वि. लक्ष्मण व ईतर** |
|---|---|

## नि.क्र.१४ खालील आदेश

दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता अर्ज आहे.

२. **वादीची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादीच्या मालकीचे व ताब्यात भूमापन क्र.२८/३ मधील १हे.१०आर क्षेत्र आहे. भूमापन क्र.२८/३ मध्ये सामाईक विहीर आहे. वादी, प्रतिवादी व ईतर यांच्यामध्ये दि.०४/०८/२००९ रोजी वडिलोपार्जित जमीन आणि विहीर यांचे लेखी वाटप झाले होते. त्याप्रमाणे फेरफार क्र.६०७ मंजूर झाला होता. त्याप्रमाणे वादी आणि प्रतिवादी यांच्या सामाईक वापराची वाद विहीर आहे. ते त्याचा उपभोग घेत आहेत. वादीच्या वडिलांच्या नावे विद्युत मोटर आहे. वादीने सदर विहिरीच्या पाण्यावर ऊसाची लागवड केली.

३. प्रतिवादी हे वादीला नुकसान करण्यासाठी सामाईक विहिरीमधून पाणी घेण्यास अडथळा करीत आहेत. वादीच्या ऊसाला पाणी न मिळाल्यास नुकसान होणार आहे. प्रतिवादींनी विद्युत मोटारीचे फ्यूज आणि स्टार्टर काढून टाकले. तसेच प्रतिवादींनी वादीची विद्युत मोटर बंद केली, विद्युत कनेक्शन तोडले व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे वादीने पोलीस ठाणे देवणी येथे प्रतिवादींविरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल केला. सामाईक विहिरीमधून पाणी न मिळाल्यास वादीचे ऊस पिक वाळून नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादींविरुध्द कायम मनाईहुकूम आणि विहिरीमधील मालकी हक्क घोषित करण्याबाबत दावा केलेला आहे. वादीच्या बाजूने मनाईहुकूमाचे घटक स्थापित होतात. प्रतिवादींनी वादीला सामाईक विहिरीमधून पाणी घेण्यास अडथळा करू नये याबाबत तात्पुरता मनाईहुकूम मागितला.

४. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी लेखी जबाब (नि.२७) दाखल केला आणि दाव्यातील संपूर्ण कथन नाकारले. त्यांनी सदर विहीर त्यांचे वडील विश्वनाथ भोसले यांना मिळाल्याबाबत नमूद केले. वादी हे त्यांचे नातेवाईक असल्याने त्यांना विहिरीचे पाणी दिले. वादीचा विहिरीशी संबंध नाही. विहिरीच्या पाण्याबाबत एक वर्षापूर्वी वाद झाला. वादीला विहिरीवर कायदेशीर हक्क नसल्याने मोफत पाणी वापरण्यास मनाई केली होती. दाव्यामध्ये मोघम कथन केलेले आहे. वादीने विहीर हडप करण्यासाठी काल्पनिक व खोटा दावा केला. नमूद घटना घडलेल्या नाहीत. सोपान भोसले यांना विहिरीच्या मोबदल्यात कालव्यापलीकडील गुड्डी राहील असा वाटणीपत्रामध्ये स्पष्ट उल्लेख आहे.

५. परंतु प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदर अर्जाला म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे सदर अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविला. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविला.

६. मी उपलब्ध अभिलेख आणि युक्तिवाद याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. त्यावरून माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेत. मी त्यावर माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे –

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | वादींना सकृद्दर्शनी प्रकरण आहे काय ? | नाही. |
| ०२ | वादींच्या बाजूने न्यायाचा समतोल आहे काय ? | होय. |
| ०३ | तात्पुरता मनाईहुकूम नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | नाही. |
| ०४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मी मां सा

७. वादींनी खालील कागदपत्रांवर भिस्त ठेवली.

| अ.क्र. | कागदपत्रांचे विवरण |
|---|---|
| १. | गाव नमुना ७/१२ उतारा |
| २. | फेरफार क्र.६०७ |
| ३. | साक्षीदारांचे प्रतिज्ञालेख |
| ४. | विद्युत जोडणीची पावती |
| ५. | विद्युत देयक |
| ६. | ऊस पावत्या |
| ७. | अदखलपात्र गुन्हा क्र.०६/२०२० ची प्रत |
| ८. | वाटणीपत्र |

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत –**

८. वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांना एकाच वेळी चर्चेकरिता घेतले आहे.

९. वादींचे अधिवक्ता श्री. आर.एम. पाटील यांनी अर्जातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला आणि वाटणीपत्रानुसार वादीचा विहिरीवर अधिकार असल्याचे युक्तिवाद करून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

१०. प्रतिवादी नियमित गैरहजर आहेत. त्यांनी सदर अर्जावर युक्तिवाद करण्यास कसूर केला. त्यांच्या युक्तिवादाशिवाय प्रकरण पुढे चालविले.

११. मी उपलब्ध अभिलेख, कागदपत्रे आणि युक्तिवाद याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सदर अर्जाच्या निकालाच्या दृष्टीने वादींचा भूमापन क्र.२८/३ मधील क्षेत्रावरील मालकी आणि ताबा हा महत्त्वाचा नाही. त्यामुळे महसूल अभिलेखातील नोंदी ह्या फारशा महत्त्वाच्या नाहीत.

**१२.** सदर अर्जाच्या दृष्टीने वादीचा विहिरीवरील हक्क महत्त्वाचा आहे. वादीच्या कथनाप्रमाणे वाटणीपत्र हे त्याबाबतचा प्रत्यक्ष पुरावा आहे. वाटणीपत्र दि.०५/०८/२००९ चे काळजीपूर्वक अवलोकन केले असता वादी, प्रतिवादी क्र.१ ते ३ व त्यांचे वडील विश्वनाथ, व्यंकट लक्ष्मण भोसले, दिगंबर व्यंकट भोसले, सुभाष व्यंकट भोसले, निलवंतबाई दिगंबर भोसले, महानंदा सुभाष भोसले, तुकाराम लक्ष्मण भोसले, मुद्रीकाबाई तुकाराम भोसले, राजेंद्र तुकाराम भोसले, बालाजी तुकाराम भोसले, ज्ञानोबा लक्ष्मण भोसले, सोपान लक्ष्मण भोसले व सुकुमारबाई सोपान भोसले हे त्यांचे पक्षकार आहेत. त्याद्वारे त्यांनी भूमापन क्र.२८/३ व ईतर मिळकतींच्या क्षेत्राचे वाटप केलेले आहे. त्याप्रमाणे वादीला भूमापन क्र.२८/३ मध्ये १हे.१०आर क्षेत्र वाटपामध्ये मिळाले. त्यामधील विहिरीसंबंधीचा मजकूर येथे पुर्नस्थापित करणे आवश्यक आहे.

*''सर्वे नं.२८/३ मधील विहिरीत विश्वनाथ व सोपानराव पिता लक्ष्मण भोसले यामध्ये दोघांचा समान हिस्सा राहील. सर्वे नं.२८/३ मध्ये ओढ्याच्या कडेने विहिरीकडे जाण्यासाठी ४ फुटाचा रस्ता कालव्याच्या कडेने श्री. ज्ञानोबा लक्ष्मण भोसले यांना राहील व २८/३ मध्ये ओढ्यातील विहीर, मोटर व पाईपलाईन श्री. ज्ञानोबा लक्ष्मण भोसले यांना स्वतंत्र राहील.''*

**१३.** उपरोक्त मजकुरावरून विश्वनाथ आणि सोपानराव म्हणजे वादीचे वडील यांना विहिरीमध्ये समान हिस्सा दिलेला आहे. वादीला विहिरीमध्ये हिस्सा दिल्याचे वाटणीपत्रामध्ये नमूद नाही. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीचे वडील हे सदर वाटणीपत्राचे पक्षकार आहेत. त्यांना वादीच्या जमिनीव्यतिरिक्त स्वतंत्रपणे सर्वे क्र.२५/२ मध्ये १ हे.३२आर व सर्वे क्र.१३१/२ मध्ये १हे.६३आर जमीन मिळालेली आहे. ते आजरोजी हयात आहेत. ते सदर दाव्यामध्ये पक्षकार नाहीत. त्यांनी वादीला सदर हक्क हस्तांतरित केल्याबाबत पुरेसे कथन किंवा कागदोपत्री पुरावा नाही. वादीने वडिलांच्या वतीने दावा दाखल केला असे सुध्दा अर्जामध्ये किंवा दाव्यामध्ये नमूद नाही. त्यामुळे वादीचा विहिरीवरील कायदेशीर हक्क प्रथमदर्शनी स्थापित झालेला नाही. तसेच महसूल अभिलेखामध्ये वादीचा विहिरीवरील हक्क नमूद नाही. वादी हा सदर विहिरीमध्ये हक्क स्थापित करण्यासाठी अयशस्वी ठरला. यथास्थितीत, वादीला कथित हक्काची

अंमलबजावणीकरिता सदर अर्जाद्वारे तात्पुरत्या मनाईहुकमाचा लाभ घेता येणार नाही.

१४. वादी हा प्रतिवादीच्या संमतीने सदर विहिरीमधून पाणी घेत असल्याचे लेखी जबाबामध्ये नमूद आहे. परंतु सदरची स्थिती ही वादीचा कायदेशीर हक्क स्थापित करण्यासाठी पुरेशी नाही. वादीने स्वतंत्रपणे त्याचा अधिकाराचा स्त्रोत स्थापित करणे आवश्यक होता. त्याअभावी वादीचा कायदेशीर अधिकार स्थापित झालेला नाही.

१५. उपरोक्त चर्चेप्रमाणे वाटणीपत्रामध्ये वादीचा विहिरीवर हक्क असल्याचे नमूद नाही. त्यामुळे त्याचे स्वत:चे शपथपत्र किंवा ज्ञानोबा लक्ष्मण भोसले, सुभाष व्यंकट भोसले, राजेंद्र तुकाराम भोसले, तुकाराम लक्ष्मण भोसले, बालाजी तुकाराम भोसले आणि चंद्रकांत ज्ञानोबा भोसले यांचे शपथपत्रे हे वाटणीपत्रातील मजकुराविरुध्द आहेत. ते वाटणीपत्रातील मजकूर वगळून वाचता येणार नाही. त्यामुळे सदर शपथपत्राचा वादीला कोणताही फायदा होऊ शकत नाही. तसेच सदर शपथपत्रातील वादीचा पाणी वापरासंबंधी आणि अडथळ्यासंबंधी मजकूर हा वादीचा कायदेशीर अधिकार स्थापित करण्यासाठी पुरेसा नाही. सबब वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी प्रकरण नाही.

१६. तुलनात्मक नुकसान किंवा आगळीक हे न्यायाचा समतोल याबाबत महत्त्वाचे घटक आहेत. प्रतिवादींनी वादीला वाद विहिरीतून पाणी घेण्यास अटकाव व अडथळा केलेला आहे. त्यामुळे निश्चितच वादीच्या शेतातील पिकास नुकसान होणार आहे. सबब वादींच्या बाजूने न्यायाचा समतोल स्थापित झाला नाही.

१७. अपरिमित नुकसान आणि तुलनात्मक हानी हे तात्पुरता मनाईहुकूमाच्या अनुषंगाने महत्त्वाचे आहे. त्यामुळे निश्चितच वादीला पाणी घेण्यास मनाई केल्यास पिकाचे नुकसान होईल परंतु सदर नुकसान हे पैशामध्ये मोजता येते. ते अपरिमित नुकसान ठरणार नाही. वादीने हक्क स्थापित करण्यासाठी सर्वप्रथम कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक आहे. त्यामुळे तात्पुरता मनाईहुकूम

दिल्यास तुलनात्मक दृष्ट्या प्रतिवादींना नुकसान होण्याची आणि त्यांच्या कायदेशीर अधिकारावर गदा येण्याची शक्यता आहे. सबब वादींच्या बाजूने अपरिमित नुकसान स्थापित झालेले नाही.

**१८.** उपरोक्त चर्चेवरून मी या निष्कर्षापर्यंत पोहचलो की, वादीच्या बाजूने न्यायाचा समतोल स्थापित झाला. परंतु वादींचा वाद विहिरीवर प्रथमदर्शनी हक्क स्थापित झाला नाही व तात्पुरता मनाईहुकूम नाकारल्यास त्यांना अपरिमित नुकसान होणार नाही. यथास्थितीत, वादींच्या बाजूने तात्पुरता मनाईहुकूमाचे घटक जसे, प्रथमदर्शनी प्रकरण व अपरिमित नुकसान हे स्थापित झालेले नाहीत. सबब मी विचारार्थ मुद्दा क्र.१ व ३ यांना नकारार्थी व मुद्दा क्र.२ ला होकारार्थी उत्तर दिले.

**मुद्दा क्र.४ बाबत –**

**१९.** उपरोक्त चर्चेप्रमाणे वादींच्या बाजूने महत्त्वाचे घटक स्थापित झालेले नाहीत. प्रथमदर्शनी प्रकरण आणि अपरिमित नुकसान च्या अभावी फक्त न्यायाचा समतोल हे तात्पुरता मनाईहुकूम मंजूर करण्यास पुरेसे नाही. वादींची वर्तणूक ही महत्त्वाची आहे. त्यांनी त्यांच्या हक्कासंबंधी आणि वडिलांचा हक्क अंमलबजावणी करीत असल्यास त्यासंबंधी सबळ कारण दिलेले नाही. वादींची वर्तणूक ही मनाईहुकूम मिळविण्यासाठी अपात्र ठरविणारी आहे. सबब, वादी तात्पुरता मनाईहुकूम मिळविण्यास अपात्र आहेत. अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. मी विचारार्थ मुद्दा क्र.४ च्या उत्तरामध्ये खालील आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. न्यायाच्या दृष्टीने अर्ज नामंजूर केला.
२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.12.24 17:15:45 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – २४/१२/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**

## प्रमाणपत्र

हे खात्रीपूर्वक असे कथित करतो की, पि.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णय  हे मूळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | श्री. मा.नि. येणगे |
| न्यायालयाचे नाव | श्री. श.अ. सुरजुसे,<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवणी |